शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
29 May 2025 - Page 10

# के. के. वाघ संस्थेचे शिबिर

**नाशिक।** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या एआयसीटीई आयडिया लॅबच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबिर उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांना लहान वयातच तंत्रज्ञानाची गोडी लागावी व त्यांना नवकल्पना शिकता याव्यात यासाठी शिबिर आयोजित करण्यात आले होते.



यावेळी शिबिरामध्ये ऑगमेंटेड रिॲलिटी, व्हर्चुअल रिॲलिटी, ड्रोन टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स, थ्रीडी प्रिंटिंग, लेझर कटिंग अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांनी दोनचाकी रोबोटिक वाहन तयार करण्याचा अनुभव घेतला. यासंदर्भात झालेल्या कार्यक्रमात विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, मुख्याध्यापिका अश्विनी पवार, डॉ. निशा इंदाईत, डॉ. पद्माकर पवार, डॉ. प्रशांत कुशारे व डॉ. रवींद्र मुंजे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी मार्गदर्शन केले.